# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १२० व्या स्मृतीदिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, बार्टी, पुणे मार्फत आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय काव्य स्पर्धेचा निकाल



दि. १० मार्च २०१७ रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १२० व्या स्मृतीदिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, बार्टी, पुणे मार्फत आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय काव्य स्पर्धेची अंतिम फेरी पार पाडण्यात आली. दि. ३ जानेवारी २०१७ रोजी सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीदिनी सदर स्पर्धेची घोषणा करण्यात आली होती. महाराष्ट्राच्या विविध जिल्हयांतून सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्यावर आधारित ३५० कविता विहित मुदतीत प्राप्त झाल्या होत्या. त्यातील उत्तम ५० कवितांची अंतिम फेरीकरीता निवड करण्यात आली. दि. १० मार्च २०१७ रोजी दु. ३ ते ६ या वेळेत बार्टीचे येरवडा येथील विभागीय जाती पडताळणी कार्यालयाचे सभागृहात बार्टीचे मा. महासंचालक राजेश ढाबरे यांच्या प्रमुख् उपस्थितीत सदर काव्य वाचन व जाहिर पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम पार पडला. उपस्थित स्पर्धकांशी संवाद साधताना मा. महासंचालक राजेश ढाबरे यांनी काव्यस्पर्धेच्या निमित्ताने सावित्रीबाई फले यांचे सामाजिक न्याय व समतेच्या प्रस्थापनेसाठीचे कार्य लोकांपर्यंत पोहोचविणे हा प्रमुख उददेश असल्याचे स्पष्ट केले. बार्टीचे प्रकाशन व प्रसिदधी विभागाच्या प्रकल्प संचालक आरती डोळस यांनी सदर स्पर्धेच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीची जबाबदारी पार पाडली.

ॲड प्रताप साळुंके, पुणे व पुष्पा कांबळे, नागपूर यांनी सदर कवितांचे परिक्षणाची महत्वपूर्ण जबाबदारी पार पाडली. स्पर्धेचा निकाल जाहिर करताना केलेल्या भाषणात ॲड प्रताप साळुंके यांनी सावित्रीबाई फुले यांच्या अष्टपॅलू व्यक्तिमत्वाचे विविध पैलू स्पर्धकांसमोर उलगडले. त्या केवळ पहिल्या महिला शिक्षिकाच नव्हे तर उत्तम कवयित्री, साहित्यिक, संपादक अशा विविध भूमिका त्यांनी लिलया पेलल्या होत्या याची माहिती दिली. उत्तम कवितांची निवड करताना सावित्रीबाई फुले यांचे केवळ जीवनकार्य मांडणाऱ्याच नव्हे तर त्यातून सद्यस्थितीत सकारात्मक बदल घडविण्यासाठी कोणता बोध घेणे अपेक्षित आहे हे मांडणाऱ्या कवितांची निवड करण्यास प्राधान्य दिल्याचे मत त्यांनी मांडले.

सोलापूर जिल्हयातील कल्याण श्रावस्ती यांनी सदर काव्य स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविला. रू. ५०००/- रोख, प्रमाणपत्र व सावित्राीबाई फुले यांची फोटो फ्रेम असे प्रथम क्रमांकाच्या पारितोषिकाचे स्वरूप होते. नांदेड जिल्हयातील शीला चुडावेकर या दिवतीय क्रमांकाच्या मानकरी ठरल्या. रू.३०००/- रोख, प्रमाणपत्र व सावित्राीबाई फुले यांची फोटो फ्रेम असे दिवतीय क्रमांकाच्या पारितोषिकाचे स्वरूप होते. पुण्याच्या दिनेश भासेले यांनी तृतीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. रू.१५००/- रोख, प्रमाणपत्र व सावित्राीबाई फुले यांची फोटो फ्रेम असे दिवतीय क्रमांकाच्या पारितोषिकाचे स्वरूप होते. सिंधुदुर्ग जिल्हयातील रामचंद्र एकनाथ कुबल, मुंबई येथील प्रदीप कासुर्डे, रत्नागिरी जिल्हयातील दामिनी आपणकर, मुंबईचे रणजित झेंडे, बुलढाण जिल्ह्यातील मोहन गव्हाणे, अमरावती जिल्हयातील आकाश शेंडे, भंडारा जिल्हयातील अभय रंगारी यांनी उत्तेजनार्थ पारितोषिके मिळविली तर सातारा जिल्हयातील प्रांजल जाधव हिला विशेष उत्तेजनार्थ पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. रू.१०००/- रोख, प्रमाणपत्र व सावित्राीबाई फुले यांची फोटो फ्रेम असे उत्तेजनार्थ पारितोषिकाचे स्वरूप होते. सर्व विजेत्या स्पर्धकांना बार्टीच्या मा. निबंधक रूपाली आवले/डंबे यांचे हस्ते परितोषिके देऊन गौरविण्यात आले. अशी माहिती आरती डोळस, प्रकल्प संचालक, प्रकाशन व प्रसिदधी विभाग, बार्टी, पुणे यांनी दिली.